सुधारित मार्गदर्शक सूचना

र-५२०

जा.क्र.विप्र-७/ डॉ.बाआकृस्वायो /मासु/२०२४-२५ /     /२०२४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,दुसरा मजला,
साखर संकुल,शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५.
ईमेल आयडी-scptsp०२४@gmail.com
दिनांक :- ३ डिसेंबर, २०२४.

प्रति,

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:- सन २०२४-२५ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना राबविणेबाबत.**

**संदर्भ :-** १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र-विघयो-२०१६/प्र.क्र.१७६/४अे, दि. ५ जानेवारी,२०१७
२) कृषि व पदुम विभाग शासन परिपत्रक क्र-संकीर्ण०९१९/प्र.क्र.२२१/१४अे, दि.०४ नोव्हेंबर,२०२०
३) कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-७/डॉ.बाआकृस्वायो/मासु/२०२१-२२/२५१६६/२१, दि.०५.०८.२०२१
४) कृषि व पदुम विभाग शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.९२/३अे, दि.२३.०५.२०२२
५) कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./विप्र-७/ डॉ.बाआकृस्वायो /तां.मा.सु/र-२१०/२०२४, दि.२७.०५.२०२४
६) कृषि व पदूम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२३/प्र.क्र.८७/३ अे, दि.०१.१०.२०२४
७) कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./विप्र-७/डॉ.बाआकृस्वायो/शा.नि./मा.सु./र-४८४/२०२४, दि.२४.१०.२०२४
८) कृषि व पदुम विभाग शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.८७/३अे, दि.०२.१२.२०२४

अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अशा शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची सन १९८२-८३ पासून राबविण्यात येत असलेली अनुसुचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) बदललेल्या परिस्थीतीत शेतकऱ्यांची आवश्यकता विचारात घेता सदर योजना सुधारीत करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने संदर्भीय दि. ५ जानेवारी, २०१७ चे शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.

सदर योजनांतर्गत निधी सामाजिक न्याय विभागाकडून संबंधित जिल्ह्यास उपलब्ध करुन देण्यात येत असून संबंधित जिल्हाधिकारी यांचे मार्फत जिल्हा परिषदेस वितरीत करण्यात येतो.सन २०२०-२१ पासून कृषि विभागाच्या योजनांची महाडीबीटी पोर्टलव्दारे अंमलबजावणी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.यामध्ये जिल्हा परिषदेकडील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या योजनेचा समावेश आहे.परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार सदर योजनांतर्गत ऑनलाईन अर्ज स्विकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलव्दारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

कृषि व पदूम विभागाचे उपरोक्त संदर्भ क्र.४ चे पत्रानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा निधी जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देणे,निधीचे पुनर्विनियोजन तसेच प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळविणे तदअनुषंगाने जिल्हाधिकारी हे नियंत्रण अधिकारी आहेत.यास्तव यापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेस संबंधित जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करुन योजनेची अंमलबजावणी करावी.तसेच,योजनेंतर्गत बाबींच्या अंमलबजावणीसाठी कृषि आयुक्तालयाने मार्गदर्शक सुचना निर्गमित कराव्यात असे शासनाने निर्देश दिले आहेत.सदर शासन पत्रातील निर्देशानुसार,यापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेस संबंधित जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावरुन प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची कार्यवाही करुन योजनेची अंमलबजावणी करावी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात

राबविण्यासाठी कृषि आयुक्तालयाचे उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार क्षेत्रीयस्तरावर सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील संबंधित घटकांच्या तांत्रिक मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करण्यात यावा व या योजनांतर्गत घटकांच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरुन आवश्यकतेप्रमाणे काही बदल/सुधारणा निर्गमित झाल्यास त्यानुसार आपणांस आवश्यक सुचना निर्गमित करण्यात येतील याबाबत कृषि आयुक्तालयाचे उपरोक्त संदर्भ क्र.५ चे पत्रानुसार कळविण्यात आले आहे.

अनुसुचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतक-यांसाठी राबविण्यात येणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या आर्थिक निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटक समाविष्ट करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.६ चे शासन निर्णयानुसार शासनाने मान्यता दिली आहे.सदर शासन निर्णय (संकेतांक २०२४१००११८१६५४११०१) महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयामध्ये या योजनेची जिल्हा परिषदेकडील कृषि विभाग व राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या समन्वयाने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आयुक्त (कृषि) यांनी क्षेत्रीय यंत्रणांना सविस्तर सुचना शासन मान्यतेने निर्गमित कराव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

या अनुषंगाने शासन निर्देशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०२४-२५ करिता योजनांतर्गत घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा संदर्भ क्र.७ चे पत्रान्वये शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.यानुषंगाने संदर्भ क्र.८ अन्वये शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार सदर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेची अंमलबजावणी तात्काळ सुरु करावी.या योजनेच्या अंमलबजावणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेकडुन घेण्यात यावी.निधी तात्काळ प्राप्त करुन घेवून नियोजित प्रयोजनासाठी पुर्णत: खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

**(र.शा.नाईकवाडी)**
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत – माहितीस्तव सविनय सादर.**

**(१) मा.सचिव,(कृषी),कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**(२) मा.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय,मुंबई – ४०० ०३२**
**(३) मा. आयुक्त, समाज कल्याण, पुणे, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१**

**प्रत : माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

**(१) मा.जिल्हाधिकारी (संबंधित सर्व)**
**(२) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**
**(३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

## सन २०२४-२५ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती / नवबौध्द शेतक-यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) सन १९८२-८३ पासून सन २०१६-१७ पर्यंत राबविण्यात येत होती. सदर योजना दीर्घ कालावधीपासुन राबविण्यात येत असल्याने कृषि व पदुम विभागाच्या दि. २४/०२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. १९/०४/२०१६ च्या अहवालावरील कृषि आयुक्तालयाच्या दि. २७/०४/२०१६ च्या शिफारसींनुसार अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांसाठी सन १९८२-८३ पासुन राबविण्यात येत असलेली विशेष घटक योजना व मा. मंत्री(वित्त) यांनी घोषीत केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या दोन योजना स्वतंत्रपणे न राबविता बदललेल्या परिस्थीतीची गरज विचारात घेवून जमिनीतील ओलावा टिकवुन ठेवण्याच्या दृष्टीकोनातून सध्याची प्रचलीत विशेष घटक योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने बदललेल्या निकषांनुसार सन २०१६-१७ पासुन राबविण्यात येत आहे.

तसेच सदर योजनांतर्गत आर्थिक निकषांमध्ये सुधारणा व नवीन घटक समाविष्ट करण्याबाबत दि.०१ आक्टोबर,२०२४ चे शासन निर्णयानुसार शासनाने मान्यता दिली आहे.

**सदर योजना सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात पुढील प्रमाणे राबविण्यात यावी.**

**१. सदर योजनेमध्ये सन २०२४-२५ या वर्षात खालील घटकांसाठी त्यापुढे नमुद रकमेच्या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.**

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन सिंचन विहीर | ४,००,०००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | १,००,०००/- |
| ३ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२,००,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ४ | इनवेल बोअरींग | ४०,०००/- |
| ५ | वीज जोडणी आकार | २०,०००/- किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ६ | पंप संच (डिझेल/विद्युत)<br>(डिझेल इंजिन - नवीन बाब) | १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ४०,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ७ | सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी) | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ५०,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |

| | | |
|---|---|---|
| ८ | एचडीपीई/पीव्हीसी पाईप (नवीन बाब) | अन्न आणि पोषण सुरक्षा -अन्नधान्य पिके या योजनेंतर्गत प्रती मीटर करिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. ५०,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. |
| ९ | सुक्ष्म सिंचन संच | |
| ९.१ | तुषार सिंचन संच पुरक अनुदान | प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून **१०%** तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून **१५% किंवा रू. ४७,०००/-** यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत) |
| ९.२ | ठिबक सिंचन संच पुरक अनुदान | प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून **१०%** तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून **१५% किंवा रू. ९७,०००/-** यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत) |
| १० | यंत्रसामुग्री (बैलचलित/ट्रॅक्टरचलित अवजारे) (नवीन बाब) | ५०,०००/- |
| ११ | परसबाग (नवीन बाब) | ५,०००/- |

**२.** सदर योजनेंतर्गत वरील ११ बाबी अंतर्भूत असुन लाभ पॅकेज स्वरुपात दयावयाचा आहे.या करीताचे पॅकेज अनु.क्र.२.१, २.२, २.३ मध्ये विषद केले आहेत.तीन पॅकेजपैकी एकाच पॅकेजचा लाभ लाभार्थीस अनुज्ञेय राहील. विशेष घटक योजनेअंतर्गत अथवा शासनाच्या कोणत्याही योजनेतून ज्या शेतकऱ्यांनी यापुर्वी नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा लाभ घेतला असेल अशा लाभार्थ्यांव्यतिरिक्त इतर सर्व लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत नवीन विहीर,जुनी विहीर दुरुस्ती व शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण यापैकी एक घटकाचा व त्यासोबतच्या पॅकेजचा लाभ देता येईल.त्याचप्रमाणे नवीन विहीर अथवा जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा यापुर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना वीजजोडणी आकार,इनवेल बोअरींग,सुक्ष्म सिंचन संच,पंपसंच,सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी) पीव्हीसी/एचडीपीई पाईप,यंत्रसामुग्री व परसबाग या घटकांचा लाभ अनुज्ञेय राहील.

सदर योजनेंतर्गत नवीन विहिर खोदणेसह अन्य सर्व बाबींची एकत्रितपणे अंमलबजाणी करणा-या लाभार्थ्यांना पूर्वसंमतीनंतर कमाल दोन वर्षाचा (निवडीचे आर्थिक वर्ष व त्यापुढील आर्थिक वर्ष) कालावधी अनुज्ञेय राहिल.

नविन विहिर खोदण्या व्यतिरिक्त अन्य बाबींकरीता निवडलेल्या लाभार्थ्यांना पूर्वसंमती मिळालेपासून एका वर्षाचे आत संबंधित बाबींची अंमलबजावणी पुर्ण करणे बंधनकारक राहिल.

**२.१ नवीन विहीर पॅकेज**

नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास नवीन विहीर,इनवेल बोअरिंग,वीज जोडणी आकार,विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन,सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी),एचडीपीई/पीव्हीसी पाईप,सूक्ष्म सिंचन संच,यंत्रसामुग्री, परसबाग या घटकांसह एकूण रु. ६,४२,०००/रु. ६,९२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

(विहीर-रु. ४,००,००० + इनवेल बोअरिंग-रु. ४०,००० + वीज जोडणी आकार-रु. २०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन-रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)-रु. ५०,००० + एचडीपीई/पीव्हीसी पाईप-रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,००० /ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री- रु.५०,००० + परसबाग रु. ५,००० = रु. ६,४२,०००/रु. ६,९२,०००)

**२.२ जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज**

जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास जुनी विहीर दुरुस्ती,इनवेल बोअरिंग,वीज जोडणी आकार,विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन,सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी),एचडीपीई/पीव्हीसी पाईप,सूक्ष्म सिंचन संच,यंत्रसामुग्री,परसबाग या घटकांसह एकूण रु. ३,४२,०००/रु. ३,९२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

(जुनी विहीर दुरुस्ती-रु. १,००,००० + इनवेल बोअरिंग-रु. ४०,००० + वीज जोडणी आकार-रु. २०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन-रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)-रु. ५०,००० + एचडीपीई/पीव्हीसी पाईप-रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,००० /ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री- रु.५०,००० + परसबाग रु. ५,००० = रु. ३,४२,०००/रु. ३,९२,०००)

**२.३. शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज :**

शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यास शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण,वीज जोडणी आकार,विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन,सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी),एचडीपीई/पीव्हीसी पाईप,सूक्ष्म सिंचन संच,यंत्रसामुग्री,परसबाग या घटकांसह एकूण रु. ४,०२,०००/रु. ४,५२,००० एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

(शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण-रु. २,००,००० + वीज जोडणी आकार-रु. २०,००० + विद्युत पंपसंच/डिझेल इंजिन-रु. ४०,००० किंवा सोलर पंप(वीज जोडणी व पंपसंच ऐवजी)-रु. ५०,००० + एचडीपीई/पीव्हीसी पाईप-रु. ५०,००० + तुषार सिंचन संच रु. ४७,००० /ठिबक सिंचन संच रु. ९७,००० + यंत्रसामुग्री- रु.५०,००० + परसबाग रु. ५,००० = रु. ४,०२,०००/रु. ४,५२,०००)

**ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच शासकीय योजनेतून विहीर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा शेतकऱ्यांना** वीजजोडणी आकार,इनवेल बोअरींग,सुक्ष्म सिंचन संच,पंपसंच,सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी),पीव्हीसी/एचडीपीई पाईप, यंत्रसामुग्री व परसबाग यासाठी अनुदान अनुज्ञेय राहील.

- **वरील घटकांपैकी लाभार्थ्याकडे काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ घेण्यासाठी निवड करावी.**

**३.लाभार्थी पात्रतेचे निकष :-**

**३.१** लाभार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक राहील.

**३.२** शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

**३.३** शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे.
(नगर पंचायत, नगरपालीका व महानगर पालिका क्षेत्राबाहेरील ( संदर्भ शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१४२/३अे,दि.२४ एप्रिल २०१८ ))

३.४ लाभार्थ्यांचे स्वत:चे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

३.५ दारीद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील.

३.६ सदर योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१,५०,०००/-वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात येत आहे. लाभार्थी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६ हेक्टर एवढी शेत जमीन असणे आवश्यक असेल. मात्र, लाभार्थ्यांची जमीन दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही.

३.७ एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटूंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही. नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.

३.८ अशाच स्वरुपाच्या कृषी विषयक विकास योजनेकरता विशेष घटक योजनेतून तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५ (A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

३.९ सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

**४. जिल्हा निवड समिती :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर लाभार्थ्याची निवड अंतीम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील.

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | - | अध्यक्ष |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जि.प. | - | सदस्य |
| भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी | - | सदस्य |
| सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण | - | सदस्य |
| विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (जिल्हा परिषद) | - | सदस्य |
| कृषि विकास अधिकारी, जि. प. | - | सदस्य सचिव |

सदर योजनेसाठी महा-डीबीटी पोर्टलचे mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेत स्थळावर शेतक-यांचे अर्ज मागविण्यात येवून संबंधित तालुक्यांना /जिल्ह्यांना प्राप्त होणा-या लक्षांकाच्या मर्यादेत प्राप्त अर्जांची ऑनलाईन सोडत काढण्यात येईल.याकरिता जिल्हानिहाय प्राप्त होणारा लक्षांक कृषि आयुक्तालय स्तरावर पोर्टलवर भरण्यात येईल.या योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हयांना उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीचे समन्यायी पध्दतीने तालुका निहाय वाटप करावे.त्या करीता जिल्हयातील एकूण अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील शेतक-यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक तालुक्यांचा आर्थिक लक्षांक निश्चित करावा. सदर तालुक्यांचा आर्थिक लक्षांक संबंधित जिल्ह्यांनी पोर्टलवर भरण्याची कार्यवाही करावी.सदर लक्षांकाच्या मर्यादेत संबंधित तालुक्यातील इच्छुक शेतक-यांमधुन पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन पध्दतीने निवड करण्यात येईल.त्यास जिल्हा निवड समितीची मान्यता घेण्यात यावी.

योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सर्व घटकांसाठी कागदपत्रे अपलोड करण्यासाठी कमाल ३० दिवसांचा कालावधी अनुज्ञेय असेल.या कालावधीत लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड न केल्यास त्यांची निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे आपोआप रद्द करण्यात येईल, याची जाणीव लाभार्थ्यांना करून द्यावी.

सोडतीव्दारे प्रत्येक तालुक्यातील लाभार्थ्याची निवड यादी महाडीबीटी पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल. जिल्ह्यास/तालुक्याकरीता प्राप्त होणा-या आर्थीक लक्षांकाच्या मर्यादेतच लाभार्थ्यांना पुर्वसंमती देण्यात यावी.याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी यांची राहील.

**५. अर्ज व त्यावरील कार्यपध्दती :-**

५.१ सदर योजनेसाठी महा-डीबीटी पोर्टलचे mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेत स्थळावर शेतक-यांचे अर्ज मागविण्यात येत असून संबंधित तालुक्यांना/जिल्ह्यांना प्राप्त होणा-या लक्षांकाच्या मर्यादेत प्राप्त अर्जांची ऑनलाईन सोडत काढण्यात येईल.सोडतीनंतर लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यापर्यंतची सर्व कार्यवाही ऑनलाईन करण्यात यावी.याबाबत संदर्भांकित दि.०४.११.२०२० रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार अर्ज स्विकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यापर्यंतची कार्यवाही करण्यात यावी.

५.२ सोडतीव्दारे नवीन विहिर व जुनी विहीर दुरुस्ती या बाबीसाठी निवडलेल्या लाभार्थ्याच्या प्रक्षेत्राची स्थळ पहाणी कृषी अधिकारी (विघयो),पं.स. यांनी करावी व तांत्रिक व्यवहार्यता तपासावी. तपासणी अंती, लाभार्थ्याचे नवीन विहीर खोदावयाचे ठिकाण तसेच, लाभार्थ्याच्या जुन्या विहीर दुरुस्तीचे प्रस्ताव तांत्रिक दृष्टया योग्य असल्यास,सदर बाबीचे अंदाजपत्रक कृषी विकास अधिकारी यांनी मंजूर करुन संबंधित लाभार्थ्याच्या प्रस्तावांना पूर्वसंमती देण्याची कार्यवाही कागदपत्रे अपलोड केल्यानंतर कमाल ३० दिवसाच्या आत करावी.त्याचप्रमाणे, स्थळपहाणी मध्ये ज्या लाभार्थ्याचे प्रस्ताव तांत्रिकदृष्टया अयोग्य आढळतील अशा लाभार्थ्यांची निवड रद्द करावी.

५.३ योजनेंतर्गत नवीन विहिर व जुनी विहीर दुरुस्ती या बाबींशिवाय अन्य बाबींसाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांना कागदपत्रे अपलोड केल्यानंतर कमाल ३० दिवसाच्या आत पुर्वसंमती देण्यात यावी व त्यांना योजनेचा लाभ चालू आर्थिक वर्षातच देण्यात यावा.

५.४ योजनेंतर्गत बाबींची विहीत कालावधीत अंमलबजावणी न करणा-या लाभार्थ्यांची पुर्वसंमती रद्द करण्यात यावी.

५.५ वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला व अपंग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल. एकूण मंजूर निधीपैकी ५ टक्के निधी अपंग लाभार्थ्याकरीता व ३० टक्के निधी महिला लाभार्थ्यांसाठी खर्च करावा.

५.६ जिल्हयाच्या लक्षांकाप्रमाणे अंतिम निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या मागणीनुसार परिशिष्ठ क्र. १ प्रमाणे जिल्हयाचा घटकनिहाय तसेच लाभार्थीनिहाय प्रारुप आराखडा ७ दिवसांचे आत तयार करण्यात यावा.प्रारुप आराखडा तयार करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.

**६. घटक अंमलबजावणी :-**

**६.१. नवीन विहीर :-**

- नवीन विहीर या घटकासाठी लाभार्थ्यास रु.४,००,०००/- च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.
- नवीन विहीरीबाबत रू ४ लाख अनुदान मर्यादेपर्यंत विहीरीची खोली असावी, १२ मीटर खोलीची अट रद्द करण्यात येत आहे.
- नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतून नवीन सिंचन विहीरीचा लाभ घेतलेला नसावा.तसेच,यापुर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहीलेल्या अपुर्ण विहीरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही.लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही.
- भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरीष्ठ भू वैज्ञानिक यांचेकडील पाणी उपलब्धततेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. पाणी उपलब्धतेचे वैयक्तीक दाखले उपलब्ध होत नसल्यास भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत गावासाठी/गावाच्या समुहासाठी पाणी उपलब्धतेचे दाखले प्राप्त करुन घ्यावेत. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) च्या व्याख्येनुसार सेमीक्रिटीकल/क्रिटीकल/ओव्हर एक्सप्लॉयटेड क्षेत्रामध्ये नवीन विहीर घेण्यात येवू नये.
- महाराष्ट्र भुजल (पिण्याच्या पाण्यासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम ३ नुसार अस्तित्वातील पेयजल स्रोताच्या ५०० मीटर परिसरात नवीन विहिर घेण्यास प्रतिबंध घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्तित्वातील पेयजल स्रोताच्या ५०० मीटर परिसरात सिंचन विहिर अनुज्ञेय करु नये.
- सदर योजना ही अनुसूचित जाती/ नवबौध्द प्रवर्गातील लाभधारकांसाठीच राबविण्यात येत असल्याने, दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट रद्द करण्यात येत आहे.

- स्थानिक व भौगोलिक परिस्थीतीनुसार शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१७ डिसेंबर, २०१२ नुसार विभागीय आयुक्त स्तरावरील समितीने निर्धारित केलेल्या तांत्रिक निकषानुसार कामे करुन विहीत वित्तीय मर्यादेच्या आत अनुदान अनुज्ञेय राहील.विहीर पुर्नभरण हि बाब शेतकऱ्याने स्वखर्चाने करण्याबाबत उद्युक्त करावे.
- नवीन विहीरीच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करुन त्यास कृषि विकास अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. अंदाजपत्रकाप्रमाणे काम भौतिकदृष्टया (व्यास व खोली) पुर्ण झाल्यानंतर जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी पुर्णत्वाचा दाखला निर्गमित करावा.अंदाजपत्रकाप्रमाणे विहीत केलेल्या खोलीपेक्षा अगोदरच ०.४० हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध झाल्यास व विहीर सुरक्षीत स्थीतीत आहे याची खात्री पटल्यास लाभधारकाची लेखी संमती घेवून काम पुर्णत्वाचे दाखले निर्गमित करता येतील.अंदाजपत्रकाप्रमाणे मंजूर रक्कम खर्च झाल्यास मात्र बांधकाम प्रलंबीत राहील्यास पुर्णत्वाचा दाखला निर्गमित करु नये.कामाच्या शेवटच्या हप्त्याचे अनुदान पुर्णत्वाचा दाखला,विहीरीचे लाभार्थ्यांसह,जीपीएस लोकेशनसह फोटो व मुल्यांकन सादर केल्याशिवाय देय रहाणार नाही.कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचेमार्फत विहीरीचे कामाची मापन पुस्तिका नोंदविण्यात यावी.तथापि, नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्तीच्या कामाचा वर्कलोड जास्त असल्यास गरजेनुसार कृषि पदवी धारण करणा-या विस्तार अधिकारी (कृषि) यांना मोजमाप नोंदविण्याचे अधिकार देण्यास कृषि आयुक्तालयाची हरकत नसल्याबाबत कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.विप्र-७/आउयो/विघयो/संकिर्ण/००९/२०१८, दि.५जानेवारी,२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.त्यानुसार ज्या तालुक्यांमध्ये कामाचा वर्कलोड जास्त आहे त्या तालुक्यांमध्ये कृषि पदवी धारण करणा-या विस्तार अधिकारी (कृषि) यांनी मोजमाप नोंदविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे आदेश घेवून मोजमाप नोंदविण्याचे काम सोपविण्यात यावे.त्याचप्रमाणे विस्तार अधिकाऱ्यास सोपविलेल्या कामांची नोंद सुरुवातीपासुन शेवटपर्यंत शक्यतो एकच अधिकारी घेईल याची कृषि विकास अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.नवीन विहीरीची आखणी करताना,निम्मे काम झालेलेचे व विहीर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देताना अक्षांश, रेखांश व स्थानिक चिन्हासह छायाचित्र घेवून ते नस्तीस ठेवावे.
- शासन पत्र क्रमांक सुसिंयो-२११७/प्र.क्र.२२७/४अे,दि.१८ सप्टेंबर, २०१७ नुसार नवीन सिंचन विहीरीचे काम अपुर्ण राहील्यास अशा कामांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी प्रकरणनिहाय आढावा घेवून सबळ कारण असल्यासच मुदतवाढीस मान्यता दयावी.सदर मुदतवाढ देताना शासन पत्र क्रमांक विघयो-१५१६/प्र.क्र.१७६/४अे, दि.२२ फेब्रुवारी, २०१७ नुसार विहीरीसोबतच्या पॅकेजचा (पंपसंच, वीज जोडणी आकार, पाईप, सुक्ष्म सिंचन संच,परसबाग इ.) लाभ आवश्यकतेनुसार पुढील आर्थिक वर्षात देण्यासही मुदतवाढ देण्यात यावी.
- लाभार्थ्याने विहीरीच्या कामाच्या दरम्यान मजूरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी.त्याची संपुर्ण जबाबदारी लाभार्थ्याची राहील.पूर्णत्वाचे दाखले निर्गमित केलेल्या विहिरींचा तपशील ७/१२ वर नोंदी घेण्यासाठी महसूल यंत्रणेला कृषी अधिकारी (विघयो),पं.स. यांनी उपलब्ध करून द्यावा. नविन विहीरीचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्याचे ७/१२ वर विहीरीची नोंद घेण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहिल.

### ६.२. जुनी विहीर दुरुस्ती :-

- स्वतःची विहीर असल्यास व त्यास दुरुस्तीची आवश्यकता असल्यास जुनी विहीर दुरुस्ती या घटकासाठी लाभार्थ्यास रु.१,००,०००/- च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.
- नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.
- या घटकाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती/ नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर विहीरीची नोंद असावी.
- जुनी विहीर दुरुस्तीच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करुन त्यास कृषि विकास अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांचेमार्फत जुनी विहीर दुरुस्तीच्या कामाची मापन पुस्तिका

नोंदविण्यात यावी. जुनी विहीर दुरुस्तीचे अनुदान विहीरीचे लाभार्थ्यांसह,जीपीएस लोकेशनसह फोटो व मुल्यांकन सादर केल्याशिवाय देय रहाणार नाही.

- विहीरीच्या कामास अंदाजपत्रकापेक्षा अधिक रक्कम लागल्यास लाभार्थीने स्वत: उभी करावयाची आहे.
- जुनी विहीर दुरुस्तीचे काम वेळेत पुर्ण करण्याबाबत लाभार्थ्याकडुन बंधपत्र घेण्यात यावे,तसेच कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती व कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद यांनी नियमित आढावा घेवून कामे पुर्ण करुन घ्यावीत.

**६.३. इनवेल बोअरींग :-**

- नवीन विहीर/जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने इनवेल बोअरींगची मागणी केल्यास रु. ४०,०००/- च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.
- इनवेल बोअरींगचे काम करतांना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता अहवाल (Feasibility Report) भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा.

**६.४. पंपसंच :- (डिझेल/विद्यूत)**

- १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ४०,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.
- नवीन विहीर,जुनी विहीर दुरुस्ती,शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण किंवा पाण्याचा स्रोत उपलब्ध असणाऱ्या लाभार्थ्यांची या योजनेंतर्गत एखाद्या घटकासाठी निवड झाल्यास त्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेतून प्राथम्य क्रमाने पंपसंच मंजूर करण्यात यावा.
- विशेष घटक योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यास पंपसंच देणे आवश्यक असल्यास, पंपसंचाचा प्रस्ताव, कृषी विकास अधिकारी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची पंपसंचाची योजना राबविणाऱ्या यंत्रणेकडे पाठवून प्राथम्य क्रमाने पंपसंच मंजूर करून घेण्याची कार्यवाही करावी.

**६.५. सोलरपंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) :**

जर शेतकऱ्यास महावितरण (किंवा शासनाच्या इतर यंत्रणेकडून) कंपनीकडुन सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु. ५०,०००/-) लाभार्थी हिस्सा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राबविल्या जाणा-या योजनेतून महावितरण कंपनीकडे भरण्यात येईल.

**६.६. वीज जोडणी आकार :-**

- रु.२०,०००/- किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.
- नवीन विहीर पॅकेज/जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज/शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती आवश्यक आहे.
- योजनांतर्गत वीज जोडणीची मागणी करणाऱ्या लाभार्थ्यांना प्राथम्याने वीजजोडणी देणेबाबत महावितरण कार्यालयाशी पाठपुरावा करावा.कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा नियोजन समिती तसेच जिल्हास्तरीय समन्वय बैठकीत निवड लाभार्थीना विद्युत कनेक्शन मिळणेबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

**६.७. शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण :-**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या अनुसूचित जाती/ नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्याने शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरण या घटकाची मागणी केल्यास, कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी क्षेत्रीय पहाणी करुन काम पुर्ण झालेल्या शेततळयांच्या आकारमानानुसार आवश्यक असणाऱ्या प्लॅस्टीक कागदाचे क्षेत्रफळ व त्याबाबतचे अंदाजपत्रक निश्चित करुन घ्यावे.
- शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरणासाठीचे परिमाण राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार देय राहील.प्लॅस्टीक फिल्म ५०० मायक्रॉन रिइनफोर्सड एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म साठी अनुदान राष्ट्रीय

फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सुचना तसेच प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

- शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ मागेल त्याला शेततळे या योजनेबरोबरच इतर योजनेंतर्गत शेततळ्याचा लाभ घेण्यात आलेल्या तसेच स्वखर्चाने शेततळे केलेल्या शेतकऱ्यांना देखील अनुज्ञेय असेल.

### ६.८. सुक्ष्म सिंचन संच :-

- **ठिबक सिंचन संचासाठी** (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी - प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १०% किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान (एकुण ९० टक्के अनुदान मर्यादेत) तसेच (२) बहू भूधारकांसाठी - प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १५% किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत) प्रदेय असेल.
- **तुषार सिंचन संचासाठी** (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी - प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १०% किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान (एकुण ९० टक्के अनुदान मर्यादित) तसेच (२) बहु भूधारकांसाठी - प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १५% किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादित) प्रदेय असेल.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन या योजनेतून सुक्ष्मसिंचन या बाबीचा लाभ घेवू इच्छिणा-या शेतक-यांना प्रथमत: प्रति थेंब अधिक पिक योजना व मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून लाभ घेणे अपेक्षीत असून या योजनेमधून फक्त Top up साठी अनुदान देण्यात येईल.
- कृषी विकास अधिकारी यांनी वरीलप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन या योजनेतून सुक्ष्मसिंचन या घटकाचे Top up साठीचे अनुदान (१०% किंवा १५% किंवा रू. ९७,०००/-किंवा रु. ४७,०००/-यापैकी जे कमी असेल ते) महाडीबीटी पोर्टलद्वारे अदा करावयाचे आहे.

### ६.९ पाईप (पीव्हीसी/एचडीपीई):-

- सदर घटकासाठी अन्न आणि पोषण सुरक्षा -अन्नधान्य पिके या योजनेंतर्गत प्रती मीटर करिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या (अनुदान मर्यादा प्रती मीटर-१)पीव्हीसी पाईप-रु.७०/-,२)एचडीपीई पाईप-रु.१००/-,३)एचडीपीई लॅमीनेटेड पाईप-रु.४०/-) किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. ५०,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.
- पाईप या बाबीच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना पाईप खरेदीकरीता पुर्वसंमती दयावी.सदर लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पाईपची खरेदी करणे आवश्यक राहील अन्यथा संबंधीत शेतकऱ्यांची पुर्वसंमती रद्द करण्यात यावी.
- सिंचनासाठी मान्यताप्राप्त प्रकाराच्या आय.एस.आय.मार्क पाईपची लाभार्थ्यांनी पूर्व संमतीने त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी.
- लाभार्थ्याने पाईप खरेदीची रक्कम स्वत:च्या आधार संलग्न बँक खात्यातून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने/धनादेश/धनाकर्ष व्दारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

### ६.१० परसबाग :-

- बियाणे, कलमे/रोपे, खते व औषधी तसेच आवश्यक साहित्य व अवजारे (Kitchen Garden Tools) साठी कमाल रुपये ५,०००/- अनुदान अनुज्ञेय राहील.

➢ वरील सर्व बाबींची अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडुन खरेदी करणे आवश्यक राहील.

**६.११ यंत्रसामुग्री (बैलचलित/ट्रॅक्टरचलित अवजारे) :-**

➢ रु.५०,०००/- चे उच्चतम मर्यादेत यंत्रसामुग्री (बैलचलित/ट्रॅक्टरचलित अवजारे) या घटकासाठी १००% अनुदान अनुज्ञेय राहील.

➢ एका लाभार्थ्यास सर्व यंत्रसामुग्री करिता रु.५०,०००/- चे उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

➢ सदर योजनेंतर्गत अनुसुचित जाती/नवबौध्द प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना प्रथम राष्ट्रीय कृषि विकास योजना तसेच कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (SMAM) अंतर्गत मंजूर असलेल्या मापदंडानुसार ५० टक्के अनुदान मिळाल्यास व आवश्यकता असल्यास उर्वरित किंमतीची रक्कम डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेमधून पुरक अनुदान (रु.५०,०००/- पर्यंत) म्हणून अनुज्ञेय राहील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत बाबींसाठी लाभार्थी निवडीपासून ते लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यापर्यंतची सर्व कार्यवाही ऑनलाईन करण्यात येईल.याबाबत संदर्भांकित दि.०४.११.२०२० रोजीचा शासन निर्णय व यानुषंगाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानुसार अर्ज स्विकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यापर्यंतची कार्यवाही करण्यात यावी.

➢ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या योजनेंतर्गत लाभ देण्यात येणा-या कृषि निविष्ठांची खरेदी लाभार्थी शेतक-यांनी अधिकृत विक्रेत्याकडून कॅशलेस पध्दतीने किंवा रोखीने करावी.सदर खरेदी रोखीने केल्यास वस्तु व सेवा कर (GST) क्रमांक असलेली खरेदी पावती सादर करणे बंधनकारक राहील.तसेच संबंधीत लाभार्थ्याने सदर खरेदीची पावती अनुदानाच्या मागणीचा दावा करताना सोबत देणे आवश्यक राहील.सदर खरेदी कॅशलेस पध्दतीने केल्यास,त्याने त्याच्या आधार क्रमांकाशी संलग्न स्वत:च्या बँक खात्यातून,विक्रेत्याला किंमतीचे प्रदान करावे.म्हणजेच NEFT/RTGS/IMPS ई.इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर किंवा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट)/धनादेश (चेक) व्दारे किंमतीचे प्रदान होणे आवश्यक आहे व त्याचा पुरावा अनुदानाच्या मागणीचा दावा करताना सोबत देणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे अनुदान संबंधित शेतक-यास अदा करताना कृषि व पदूम विभागाच्या शासन निर्णय क्र-संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७अे, दि.१९.०४.२०१७ मध्ये नमूद केलेल्या इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

➢ कृषि विकास अधिकारी,जिल्हा परिषद यांनी सदर योजनांतर्गत अंतिम प्रदानासाठी प्राप्त झालेली देयके PFMS प्रणालीव्दारे मेकर म्हणून तपासून त्यांची लाभार्थीनिहाय PFMS DBT च्या विहीत प्रपत्रात यादी तयार करुन आपले शिफारशीसह संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी PFMS प्रणालीव्दारे चेकर या नात्याने अनुदान संबंधित लाभार्थ्यास अदा करावे.

➢ अनुज्ञेय अनुदानाची रक्कंम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे वर्ग करावी.

**७. प्रशासकीय व वित्तीय मान्यता :-**

सदर योजनेस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडुन जिल्हाधिकारी स्तरावर निधी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने त्या विभागाच्या शासन निर्णय क्रमांक विघयो-२०१०/प्र.क्र.२६/विघयो,दि.१३ एप्रिल,२०१७ तसेच कृषि व पदूम विभाग शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.९२/३अे,दि.२३.०५.२०२२ नुसार सदर योजनेस नियंत्रक अधिकारी म्हणून संबंधीत जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात यावी.

**८. लाभार्थ्यांची निवड रद्द करणे :-**

लाभार्थीच्या निवडीचे अंतीम अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील.खालील कारणांमुळे जर काही लाभार्थीची निवड रद्द करणे क्रमप्राप्त असल्यास त्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील.

८.१ समितीने निवड केलेला शेतकरी मयत झाल्यास.

८.२ निवड केलेल्या शेतक-याने सर्व शेतजमीन विकून तो भुमीहीन झाला असल्यास.

८.३ निवड केलेल्या शेतक-याने अर्थसहाय्य घेण्यास नकार दिल्यास.

८.४ निवड केलेला शेतकरी शेती विकास योजना हाती घेण्यास इच्छूक नसल्यास तसेच विहीत कालमर्यादेत काम सुरु करण्यास/पुर्ण करण्यास टाळाटाळ करीत असल्यास.

८.५ निवड केलेला शेतकरी योजनेखाली घेतलेल्या अनुदानाचा गैरवापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास.

८.६ लाभार्थीची निवड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार झाली नसल्याचे आढळून आल्यास.

वरील परिस्थितीमुळे लाभार्थ्याची निवड रद्द झाल्यास त्याबाबत कागदोपत्री सर्व आवश्यक पुरावे ठेवून तसे लाभधारकास लेखी कळविणे संबंधीत कृषि विकास अधिकारी यांना बंधनकारक राहील.या सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर केवळ कृषि विकास अधिकारी यांना त्यांचे महाडीबीटी पोर्टलवरील log in मधून लाभार्थ्याची निवड रद्द करण्यास मुभा राहील.

८.७ मृत लाभधारकाऐवजी त्याचा वारस योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक असल्यास त्याची निवड प्राथम्याने करण्यात यावी.मयत झालेल्या लाभधारकाबाबत त्यांचे कायदेशीर वारसांची निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी व उर्वरीत अर्थसहाय्य त्यांना देण्याबाबत निर्णय घेवून कार्यवाही करावी.अशा प्रकरणी कायदेशीर बाबींची सर्वतोपरी पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

- अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत योजनेच्या सुरवातीपासुन निवड केलेले लाभार्थ्यांचे मास्टर रजिस्टर कृषी अधिकारी (वि.घ.यो.),पं.स.यांचेकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.
- **लाभार्थी रजिस्टर** – सदर योजनेंतर्गत लाभार्थीची नोंदवही जिल्हास्तर व पंचायत समिती स्तरावर अद्यावत ठेवण्यात यावी.पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीची किमान महिन्यातुन एकदा तपासणी करण्याची जबाबदारी जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांची राहील.तसेच जिल्हास्तरावरील नोंदवहीची तपासणी करण्याची जबाबदारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/कृषि विकास अधिकारी यांची राहील.

## ९. अनुदानाची व्दिरुक्ती :-

- एकदा संबंधीत योजनेचा पुर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही.
- अशा स्वरुपाच्या कृषि विषयक विकास योजनेकरीता विशेष घटक योजनेतून तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५ (A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजने अंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.
- सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्याच्या ७/१२ उताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.
- लाभाची द्वीरुक्ती होणार नाही याची दक्षता कृषि विकास अधिकारी यांनी घ्यावी.याकरिता कृषी विकास अधिकारी यांनी योजनेच्या सुरवातीपासुन उपलब्ध असणाऱ्या लाभार्थ्यांचे मास्टर रजिस्टरची पडताळणी करावी.तसेच सदर योजनेचा/योजनेंतर्गत घटकाचा यापूर्वी लाभ घेतला नसलेबाबत लाभार्थीकडून स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे.

## १०. प्रचार व प्रसिध्दी :-

सदर योजनेची तसेच योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी ९० टक्के अनुदान उपलब्ध असल्याचे जिल्हास्तरावरुन व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी.त्याकरीता कृषि विकास अधिका-यांनी जिल्हयातील प्रमुख वृत्तपत्रांमध्ये या योजनेंतर्गत शेतक-यांना अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येणा-या बाबी व त्याकरीता मिळणारे अनुदान याच्या सविस्तर तपशिलासह जाहिरात प्रसिध्द करुन योजनेंतर्गत उपलब्ध बाबींसाठी इच्छूक शेतक-यांना अर्ज करण्यास सूचित करण्यात यावे.

या योजनेची माहिती सर्व शेतकरी बांधवांना व्हावी या दृष्टिने जिल्हास्तरावर कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी.गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी.आपल्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत देखील प्रसिध्दी द्यावी.सदर योजनेची सविस्तर माहिती पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी (वि.घ.यो.) तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्याकडे उपलब्ध ठेवावी.तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

कृषि विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी/अधिकारी यांनी गावपातळी/तालुका स्तरावर प्रदर्शनाच्या माध्यमातूनही योजनेची माहिती देण्यात यावी.

**११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक विघयो २००९/प्र.क्र.८४९/विघयो-१, दि. ४/२/२०१० नुसार प्रशासकीय मान्यता देणे, पुर्नविनियोजन करणे इ. बाबत सुधारित कार्यपध्दतीस मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील अनुसूचित जाती उपयोजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे या परिच्छेदामध्ये विधिमंळाच्या अंदाज समितीने खालीलप्रमाणे बदल करण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र. विघयो-२०१०/प्रक्र. २६/विघयो, मंत्रालय मुंबई दि. १३ एप्रिल, २०१७ नुसार शासनाने मान्यता दिली आहे. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे त्या जिल्ह्याच्या अनुसूचित जाती उपयोजनेसाठी निधी वाटपा संबंधात नियंत्रक अधिकारी राहतील. हे त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुर्नवाटप करण्यास ते सक्षम राहतील.

(i) निधीचा प्रशासकीय संकेतांक हा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत हाताळण्यात येईल. योजनेच्या संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेकडुन कॅश फलो मागवून घेऊन मासिक निधी विवरणपत्र तयार करावे.

(ii) जिल्हा योजनेतील राज्य तरतूद जिल्हा नियोजन विकास मंडळाकडुन करुन अर्थसंकल्पीय तरतूद वाटप जिल्हाधिकारी कार्यान्वयीन यंत्रणेला करतील. अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर त्याची नोंद घेणे, कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेस प्रशासकीय मान्यता देणे, त्यानुसार निधी वितरण आदेश काढणे व कार्यान्वयीन यंत्रणेस निधी वितरण करणे.

(iii) जिल्हाधिकारी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याचे आत कार्यान्वयीन यंत्रणांना निधीचे वाटप करणे आवश्यक राहील. एखाद्या जिल्हाधिका-याने सदर जबाबदारी वेळीच पार पाडली नाही तर संबधीत विभागीय आयुक्त यांनी संबधीत जिल्हाधिका-याकडून निधी वाटपाचे काम पूर्ण करून घेणे अनिवार्य राहील.

(iv) आर्थिक वर्षामध्ये करण्यात आलेले पुर्नविनियोजन / पुर्नवितरणाबाबत योजनानिहाय सविस्तर माहिती आर्थिक वर्ष संपताच शासनास सादर करावयाची आहे जेणेकरुन "अंतिम सुधारित तरतूद (FMG)" निश्चित करणे शक्य होईल.

अनुसूचित जाती उपयोजना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने राबविण्यास शासनाने मान्यता दिली असल्याने या योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची वरीलप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती नुसार कार्यवाही करण्यात यावीत.

वरील सुचनानुसार कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांनी जिल्हास्तरीय आराखडा तयार करून त्यानुसार जिल्हा नियोजन मंडळ (डीपीसी) मध्ये आवश्यक तरतुद मंजूर करून घ्यावी. त्यानुसार जिल्हाधिकारी यांना निधी प्रवाह (Cash Flow) सादर करुन अनुदान उपलब्ध करून घ्यावे व खर्चाची कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी कार्यालयास निधीची मागणी करून अनुदान उपलब्ध करून घेण्याची सर्व जबाबदारी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद यांची राहील.

**१२. संकिर्ण/आकस्मिक खर्च :-** सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या ३ टक्के इतका निधी संकिर्ण/आकस्मिक खर्चाच्या बाबीसाठी (उदा.जिल्हा परिषद तसेच तालुका स्तरावर संगणक घेण्यासाठी, विविध नोंदवह्या, तपासणी फ़ॉर्म, इतर स्टेशनरी तसेच तालुका, जिल्हा स्तरावर बैठकीसाठी लागणारा खर्च व योजना राबविण्यासाठी आवश्यक इतर अनुषंगिक बाबीसाठी लागणारा खर्च) खर्च करण्यास तसेच सदर योजनेच्या अनुषंगाने शासन स्तरावर व आयुक्तालय स्तरावर झालेल्या बैठकीसाठी लागणारा खर्च जिल्ह्यांना उपलब्ध करुन दिलेल्या ३ टक्के आकस्मिक खर्चातुन चक्राकार पध्दतीने भागविण्यास उपरोक्त संदर्भीय दि.२१ जून २०१८ चे शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

**१३. तांत्रिक मान्यता :-** योजनेच्या मार्गदर्शक सूचना याच योजनेसाठी तांत्रिक मान्यता समजण्यात याव्यात.

**१४. मासिक प्रगती अहवाल :-** योजनेचा मासिक प्रगती अहवाल कृषि विकास अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्र १ ते ३ मध्ये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यन्त कृषि आयुक्तालय, समाज कल्याण आयुक्तालय, संबंधीत जिल्हाधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडे नियमीतपणे पाठवावा.विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने विभागाचा एकत्रित मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास ईमेलव्दारे (scptsp०२४@gmail.com) तसेच टपालाव्दारे सादर करावा.

**१४. तपासणी :-** योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी करावयाच्या घटकनिहाय तपासणीची टक्केवारी परिशिष्ठ २ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. सदर परिशिष्ठात दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी त्याचे कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची क्षेत्रनिहाय समप्रमाणात परिशिष्ठ ३ व ४ नुसार तपासणी करावी.कृषी अधिकारी (वि.घ.यो),पं.स. व जिल्हा कृषी अधिकारी(वि.घ.यो) यांनी त्यांचे तपासणीचे अहवाल कृषी विकास अधिकारी यांना सादर करावेत.कृषी विकास अधिकारी यांनी अधिनस्त अधिकाऱ्यांची तपासणी विहित प्रमाणात होत असल्याची खात्री करावी व अहवाल जि.प.स्तरावर जतन करून ठेवावेत. कृषी विकास अधिकारी यांनी त्यांचे तपासणीचा अहवाल प्रपत्र-४ मध्ये कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत ईमेलव्दारे (scptsp०२४@gmail.com) तसेच टपालाव्दारे सादर करावा.

**सोबत :** १) परिशिष्ठ १ ते ६
२) प्रपत्र - १ ते ४

**(र.शा.नाईकवाडी)**
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

## परिशिष्ठ – १

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेचा प्रारुप आराखडा

**जिल्हा --------------** **दिनांक ---------------**

**निवडलेले एकूण लाभार्थी संख्या : महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----.**

**सन २०२४-२५ मध्ये मंजूर निधी -------------**

**अ) घटकनिहाय**

| अ. क्र. | घटक | लाभार्थ्याची मागणी | |
|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक |
| १ | नवीन सिंचन विहीर | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | |
| ३ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | |
| ४ | इनवेल बोअरींग | | |
| ५ | वीज जोडणी आकार | | |
| ६ | एचडीपीई /पीव्हीसी पाईप | | |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच | | |
| ७.१ | तुषार सिंचन संच | | |
| ७.२ | ठिबक सिंचन संच | | |
| ८ | यंत्रसामुग्री(बैलचलित/ट्रॅक्टरचलित अवजारे) | | |
| ९ | परसबाग | | |
| एकूण | | | |
| १० | पंप संच (डिझेल/विद्युत) | | |
| ११ | सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी ) | | |
| एकूण | | | |

**ब) लाभार्थीनिहाय**

| अ. क्र. | लाभार्थीचे नाव | घटक | | | | | | | | | | एकुण मागणी (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन विहीर | जुनी विहीर दुरुस्ती | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | इनवेल बोअरींग | वीज जोडणी आकार | पाईप | ठिबक सिंचन संच | तुषार सिंचन संच | यंत्र सामुग्री | परसबाग | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| एकुण | | | | | | | | | | | | |

**लाभार्थ्याने ज्या घटकांची ऑनलाईन मागणी केलेली आहे त्या घटकांची अनुदान मर्यादा नमुद करुन लाभार्थ्यांची एकुण मागणी नमुद करावी.**

## परिशिष्ठ - २

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत अधिकाऱ्यांनी करावयाच्या तपासणीची टक्केवारी**

| अ. क्र. | तपासणी अधिकारी | घटकनिहाय टक्केवारी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन विहीर | जुनी विहीर दुरुस्ती | शेततळ्यां चे प्लॅस्टीक अस्तरी करण | इनवेल बोअरींग | वीज जोडणी आकार | पाईप | सुक्ष्म सिंचन संच | यंत्र सामुग्री | परसबाग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | विभागीय कृषि सह संचालक (कार्यालयातील वर्ग - २ व त्या पुढील अधिकारी) | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| २ | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ३ | जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) जिल्हा परिषद | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ४ | कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समितीस्तर | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

## परिशिष्ठ - ३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत **नवीन विहीर/ जुनी विहीर दुरुस्ती** या घटकांच्या तपासणीसाठी परिशिष्ठ -

१. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम -
२. तपासणी दिनांक -
३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता -
४. नवीन विहीर घेतलेल्या /जुनी विहीर दुरुस्ती करावयाच्या क्षेत्राचा सर्वे नंबर व क्षेत्र -
५. नवीन विहीर /जुनी विहीर दुरुस्तीचा अंदाजपत्रकीय खर्च -
६. तांत्रिक मान्यता क्रमांक/दिनांक व रक्कम -
७. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या कामाची स्थिती -
८. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या पुर्ण केलेल्या कामाची अंदाजीत रक्कम -
९. पैकी लाभार्थीस दिलेले अनुदान -
१०. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली (आरटिजीएस / एनईएफटी) -
११. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक) -
१२. लाभार्थ्याच्या बँक खात्यावर अनुदान अदा केल्याचा दिनांक -
१३. तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय -

तपासणी दिनांक

तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

<u>परिशिष्ठ - ४</u>

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन **योजनें अंतर्गत इतर घटकांच्या तपासणीचे परिशिष्ठ**

१. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम -

२. तपासणी दिनांक -

३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता -

४. लाभार्थीने मागणी केलेल्या बाबी -

५. खरेदी दिनांक -

६. दिलेल्या लाभाचा तपशील व रक्कम -

७. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली (आरटिजीएस / एनईएफटी) -

८. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक) -

९. लाभार्थ्याच्या बँक खात्यावर अनुदान अदा केल्याचा दिनांक -

१०. काम पुर्ण झाल्याचा दिनांक -

११. तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय -

तपासणी दिनांक — तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

**प्रपत्र – १**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०२३-२४ या योजनेच्या खर्चाचा अहवाल**

**जिल्हा ----** **अहवाल कालावधी माहे , २०२४ अखेर**

**निवडलेले एकूण लाभार्थी संख्या -महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----** **सन २०२३-२४ मध्ये प्राप्त निधी - -----**

**झालेला एकूण खर्च - ----------** **एकूण शिल्लक निधी ---------**

**निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी पुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या ----** **अपुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या ----**

**(रक्कम रु.लाखात)**

| अ. क्र. | घटक | लक्षांक | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नवीन विहीर | | | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | |
| ३ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | | | |
| ४ | इनवेल बोअरींग | | | | |
| ५ | वीजजोडणी आकार | | | | |
| ६ | अ) ठिबक सिंचन संच | | | | |
| | ब) तुषार सिंचन संच | | | | |
| ७ | पंपसंच | | | | |
| ८ | अभिकरण शुल्क | | | | |
| ९ | आकस्मिक खर्च | | | | |
| **एकुण** | | | | | |
| **सन २०२३-२४ या वर्षात प्रत्यक्ष निवडलेले लाभार्थी संख्या ---------** | | | | | |
| **निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर मागणीप्रमाणे संपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी संख्या -----** | | | | | |
| **निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे -----अखेर त्यांचे मागणीप्रमाणे अपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी संख्या -** | | | | | |
| **निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर कोणताही लाभ न दिलेले शिल्लक लाभार्थी संख्या ----** | | | | | |

**वरील प्रमाणे बाब निहाय अहवाल सादर करावा. पॅकेज निहाय अहवाल सादर करु नये**

## प्रपत्र – २

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन २०२४-२५ या योजनेच्या खर्चाचा अहवाल**

जिल्हा ----- अहवाल कालावधी माहे , २०२४ अखेर

निवडलेले एकुण लाभार्थी संख्या -महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण ----- सन २०२४-२५ मध्ये प्राप्त निधी - -----

झालेला एकूण खर्च - ---------- एकूण शिल्लक निधी --------

निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी पुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या ----- अपुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या -----

(रक्कम रु.लाखात)

| अ. क्र. | घटक | लक्षांक | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नवीन विहीर | | | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | |
| ३ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | | | |
| ४ | इनवेल बोअरींग | | | | |
| ५ | वीजजोडणी आकार | | | | |
| ६ | अ) ठिबक सिंचन संच | | | | |
| | ब) तुषार सिंचन संच | | | | |
| ७ | पाईप | | | | |
| ८ | परसबाग | | | | |
| ९ | यंत्रसामुग्री | | | | |
| १० | आकस्मिक खर्च | | | | |
| ११ | अभिकरण शुल्क | | | | |
| एकुण | | | | | |
| सन २०२४-२५ या वर्षात प्रत्यक्ष निवडलेले लाभार्थी संख्या --------- | | | | | |

| |
|---|
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर मागणीप्रमाणे संपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी संख्या ----- |
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे -----अखेर त्यांचे मागणीप्रमाणे अपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी संख्या - |
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर कोणताही लाभ न दिलेले शिल्लक लाभार्थी संख्या ---- |

वरील प्रमाणे बाब निहाय अहवाल सादर करावा. पॅकेज निहाय अहवाल सादर करु नये

## प्रपत्र - ३ (अ)
## नवीन सिंचन विहीरीच्या कामाच्या प्रगतीचा मासिक अहवाल

**जिल्हयाचे नांव -** दि. ------------ ते दि. --------------

(रक्कम रु. लाखात)

| नवीन विहीरी साठी निवडले ल्या लाभार्थ्यां ची संख्या | पैकी कार्यारंभ आदेश दिलेल्या विहीरीं ची संख्या | पैकी कामे सुरु झाले ल्या विहीरीं ची संख्या | पुर्ण विहीरीचा तपशील | | अपुर्ण विहीरीचा तपशील | | | | झालेला एकुण खर्च | कार्यारंभ आदेश देऊनही अद्याप कामे सुरु न झालेल्या विहीरींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १०० टक्के खोदाई व बांधकाम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | पुर्ण झाले ल्या विहीरी वरील खर्च | १०० टक्के खोदाई काम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | ५० टक्क्यां पेक्षा जास्त काम झालेल्या विहीरींची संख्या | ५० टक्क्यां पेक्षा कमी काम झालेल्या विहीरींची संख्या | अपुर्ण विही री वरील झाले ला खर्च | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

## प्रपत्र - ३ (ब)
## जुनी विहीर दुरुस्ती कामाच्या प्रगतीचा मासिक अहवाल

**जिल्हयाचे नांव -** दि. ------------ ते दि. --------------

| जुनी विहीर दुरुस्ती साठी निवडले ल्या लाभार्थ्यांची संख्या | पैकी कार्यारंभ आदेश दिलेल्या विहीरीं ची संख्या | पैकी कामे सुरु झालेल्या विहीरींची संख्या | कामाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजपत्रका प्रमाणे १०० टक्के पुर्ण काम झालेल्या विहीरींची संख्या | अंदाजपत्रका प्रमाणे ५० टक्के पेक्षा जास्त काम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | अंदाजपत्रका प्रमाणे काम ५० टक्के पेक्षा कमी काम पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या | झालेला एकुण खर्च (रु. लाखात) | कार्यारंभ आदेश देऊनही अद्याप कामे सुरु न झालेल्या विहीरींची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

## प्रपत्र - ३ (क)

## शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरणाच्या कामाचा प्रगती तपशील

**जिल्हयाचे नांव -** **दि. ------------- ते दि. --------------**

| शेततळयाचे प्लॅस्टीक अस्तरीकरणा साठी निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या | पैकी कार्यारंभ आदेश संख्या | पैकी कामे पुर्ण संख्या | झालेला एकुण खर्च (रु. लाखात) | कार्यारंभ आदेश देवूनही कामे सुरु न झालेली संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## प्रपत्र - ४ (अ)

**सन २०२३-२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत लाभार्थी तपासणीचा मासीक अहवाल-**

**विभाग ---------जिल्हा ---------- माहे ---------- अखेर**

| अ. क्र. | घटक | तपासणी केलेल्या लाभार्थींचा तपशील | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभ दिलेले एकुण लाभार्थी | चालु महिन्यात तपासलेले लाभार्थी | मागील महिन्यापर्यंत तपासलेले लाभार्थी | एकुण तपासलेले लाभार्थी | तपासणी टक्केवारी | |
| १ | नवीन विहीर | | | | | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | | | |
| ३ | इनवेल बोअरींग | | | | | | |
| ४ | वीज जोडणी आकार | | | | | | |
| ५ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | | | | | |
| ६ | सुक्ष्म सिंचन संच | | | | | | |
| ७ | पंप संच | | | | | | |
| | **एकुण** | | | | | | |

तपासणी अधिकारी यांचे नाव,पदनाम व स्वाक्षरी

प्रपत्र - ४ (ब)

सन २०२४-२५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत लाभार्थी तपासणीचा मासीक अहवाल-

विभाग ----------जिल्हा -----------  माहे ----------- अखेर

| अ. क्र. | घटक | तपासणी केलेल्या लाभार्थीचा तपशील | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभ दिलेले एकुण लाभार्थी | चालु महिन्यात तपासलेले लाभार्थी | मागील महिन्यापर्यंत तपासलेले लाभार्थी | एकुण तपासलेले लाभार्थी | तपासणी टक्केवारी | |
| १ | नवीन विहीर | | | | | | |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | | | | | | |
| ३ | इनवेल बोअरींग | | | | | | |
| ४ | वीज जोडणी आकार | | | | | | |
| ५ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | | | | | | |
| ६ | सुक्ष्म सिंचन संच | | | | | | |
| ७ | पाईप | | | | | | |
| ८ | परसबाग | | | | | | |
| ९ | यंत्रसामुग्री | | | | | | |
| | **एकुण** | | | | | | |

तपासणी अधिकारी यांचे नाव,पदनाम व स्वाक्षरी

## <u>परिशिष्ठ -५</u>

शेतकऱ्याने द्यावयाचे हमीपत्र

मी.श्री/श्रीमती ----------------------, रा,------------,तालुका-----------,जिल्हा --------------, लिहून देतो/देते कि, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या योजनेंतर्गत अर्ज करत असलेल्या घटकांचे यापूर्वी कोणत्याही शासकीय योजतेतून मी लाभ घेतला नाही.घटकाच्या लाभाची द्विरुक्ती झाली नाही.

तथापि भविष्यात लाभाची द्विरुक्ती झाल्याचे निष्पन्न झाल्यास सदर घटकाच्या लाभाची संपूर्ण रक्कम मी एकरकमी शासनास परत करीन. तसे न झाल्यास माझ्या ७/१२ वर सदर बाबतचा बोजा चढविणेस माझी काहीही हरकत राहणार नाही.

दिनांक :

स्थळ ;

शेतकऱ्याची सही/अंगठा , संपूर्ण नाव

# परिशिष्ठ – ६
## करारनामा नमुना

आम्ही खाली सही करणार १) श्री./श्रीमती --------------------------------, रा,------------,तालुका---------,जिल्हा -------------, २) श्री./श्रीमती --------------------------------, रा,------------,तालुका-----------,जिल्हा -------------, ३) श्री./श्रीमती --------------------------------, रा,------------,तालुका-----------,जिल्हा -------------, येथील रहिवासी शेतकरी असून आमच्याकडे अनुक्रमे ८ अ नुसार १)-------------,२) -------------,३)------------- हे. क्षेत्र आहे.सदर क्षेत्रासाठी आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या योजनेंतर्गत घटकांचा लाभ घेण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या अमलबजावणी सूचनानुसार विहित अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत व त्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना बंधनकारक राहतील याची आम्हाला जाणीव आहे.

१) आमच्यापैकी श्री./श्रीमती-----------------,रा,------------,तालुका----------,जिल्हा -------------,यांचे नावे असलेल्या गट नं.-------,सर्वे नं. ----- मधील ---------हे.क्षेत्रावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या योजनेंतर्गत घटकांचा लाभ देण्यास आमची कोणतीही हरकत नाही व अनुदानाची रक्कम रक्कम त्यांचे आधार सलग्न बँक खात्यावर (खाते क्रमांक ------------) जमा करण्यास आमची कोणतीही हरकत नाही.

२) पूर्वसंमती नंतर विहित कालमर्यादेत डॉ .बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत घटकांची अंमलबजावणी करणे आम्हाला बंधनकारक राहील.तसेच सदर योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या घटकांचा आम्ही सर्व मिळून सामूहिकरीत्या वापर करण्यास तयार आहोत व त्यामध्ये कुठलीही वाद होणार नाही,याची आम्ही खात्री देतो.

३) विजेचे येणारे बिल व इतर अनुषंगिक खर्च आम्ही एकत्रितरीत्या सहमतीने भरण्यास तयार आहोत.

४) योजनेतील घटकांची संरक्षण, देखभाल,दुरुस्ती करण्याची जबाबदारी आमची राहील याची आम्हाला जाणीव आहे.

५) शासनाचे मापदंडापेक्षा अधिकचा खर्च आल्यास तो आम्ही स्वतः करण्यास तयार आहोत.

६) अश्या स्वरूपाचा लाभ कोणत्याही शासकीय योजनेतून यापूर्वी आमच्यापैकी कुणीही घेतला नाही.

आम्ही खाली सही करणार कोणत्याही दबावाखाली न येता पूर्ण विचारांती सहमतीने करार करीत आहोत.

| अ.क्र. | शेतकऱ्यांची नावे | सही |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |